रिट याचिका क्र.११२४९/२०२२ (दिवानी अर्ज क्रमांक १६९८४/२०२२ सह) च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि. २४.११.२०२५ आणि दि.१८.१२.२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार धाराशिव जिल्हयाकरिता खरीप हंगाम, २०२० मधील राज्य शासनाकडून देय असलेल्या अनुदानाच्या दुसऱ्या हप्त्याची रक्कम वितरीत करण्याबाबत.

---

**महाराष्ट्र शासन**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः न्यायप्र-२०२२/प्र.क्र.६०(भाग-१)/११-अे,ई.ऑ.क्र. १५४८५६१**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

दिनांक: ११ फेब्रुवारी, २०२६

**वाचा -**

१) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. प्रपिवियो-२०२०/प्र.क्र.४०/११-अे, दि.२९.०६.२०२०

२) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. एबख-२०२५/प्र.क्र.७३/२-अे, दि.०६.०६.२०२५

३) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद चे रिट याचिका क्र.११२४९/२०२२(दिवानी अर्ज क्रमांक १६९८४/२०२२ सह), संदर्भातचे आदेश, दि.२४.११.२०२५, दि.१८.१२.२०२५

४) जिल्हाधिकारी, धाराशिव यांचे पत्र क्रं. प्रपिवियो/खरीप हंगाम/२०२०/३९६५, दि.२७.११.२०२५

५) आयुक्त(कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.कृआ /प्रपिवियो/सां.८/WP/मागणी/र-६९१/२०२५, दि.२३.१२.२०२५

**प्रस्तावना :-**

खरीप २०२० दरम्यान महाराष्ट्रात मुसळधार पाऊस पडला, ज्यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर, सन २०२०-२१ मध्ये बाधित शेतकऱ्यांना संबंधित विमा कंपन्यांना वेळेवर पीक नुकसानीच्या सूचना देण्यात अडचणी आल्या. राज्य सरकारने या कंपन्यांना एनडीआरएफने केलेल्या पंचनाम्याच्या आधारे भरपाई देण्याची विनंती केली. तथापि, विमा कंपन्या त्याचे पालन करण्यास तयार नव्हत्या. परिणामी, राज्य सरकारने एनडीआरएफ सर्वेक्षणाच्या आधारे शेतकऱ्यांना आवश्यक भरपाई देईपर्यंत, खरीप २०२० (दुसरा हप्ता) आणि रब्बी २०२०-२१ साठी प्रीमियम सबसिडी देण्यास स्थगिती देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या मान्यतेने घेतला.

दरम्यान धाराशीव जिल्हयातील काही शेतकऱ्यांनी खरीप, २०२० मध्ये त्यांच्या सोयाबीन पीकाच्या झालेल्या नुकसानाची भरपाई मिळण्याबाबत मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. ९१/२०२१, ६४/२०२१ आणि रिट याचिका क्र.६८५९/२०२१ दाखल केल्या होत्या. सदर याचिकांव्दारे करण्यात आलेली

विनंती मान्य करुन संबंधित पात्र शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने त्यांच्या दि.०६.०५.२०२२ च्या आदेशाव्दारे निर्देशित केले होते. सदर आदेशाविरोधात संबंधित विमा कंपनीने (बजाज अलियांज इन्शुरन्स कंपनी) मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केल्या होत्या. तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या दि.०५.०९.२०२२ व दि.३०.०९.२०२२ च्या आदेशाव्दारे सदर विशेष अनुमती याचिका खारीज केल्या. तदनंतर बजाज अलियांज इन्शुरन्स कंपनीने जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी महसूल वसूली प्रमाणपत्रांच्या माध्यमातून केलेल्या वसूली विरुध्द आणि नुकसान भरपाई ही एकूण विमा उतरविलेल्या क्षेत्राच्या आधारे देणे, याकरिता निर्देश देण्याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र. क्र.११२४९/२०२२ (दिवानी अर्ज क्रमांक १६९८४/२०२२ सह) दाखल केली होती. सदर रिट याचिकेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी त्यांच्या दि.२४.११.२०२५ आणि दि.१८.१२.२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशाव्दारे पुढीलप्रमाणे निर्देशित केले आहे :-

अ) बजाज अलियांज इन्शुरन्स कंपनीने मा. उच्च न्यायालयात जमा केलेले रु.७५.०० कोटी व त्यावरील व्याज पात्र शेतकऱ्यांना वितरीत करण्यासाठी राज्य सरकारला द्यावेत.

आ) राज्य शासनाने बजाज अलियांज इन्शुरन्स कंपनीस द्यावयाचा विमा हप्त्याचा दुसरा हप्ता थेट पात्र शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी वापरण्यात यावा.

मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्देशांनुसार, जिल्हाधिकारी, धाराशिव(उस्मानाबाद) यांनी संदर्भ क्र.(४) येथील पत्रान्वये, प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या खरीप हंगाम २०२० मधील धाराशीव जिल्ह्याचा उर्वरित(दुसरा) राज्य हिस्सा देय अनुदान रक्कम रु.१३४,११,९१,९३८/- इतका निधी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, धाराशीव यांना वितरीत करण्याबाबत विनंती केली आहे. तद्नुषंगाने आयुक्त(कृषि) यांनी संदर्भ क्र.(५) येथील पत्रान्वये, प्रस्तुत न्यायालयीन प्रकरणी, प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीकरिता आयुक्तालय स्तरावर उघडलेल्या ESCROW बँक खात्यामधील जमा रक्कमेतून खरीप हंगाम २०२० मधील धाराशीव जिल्ह्याचा उर्वरित(दुसरा) राज्य हिस्सा देय अनुदान रक्कम रु.१३४,११,९१,९३८/- इतका निधी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, धाराशीव यांना वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्याची विनंती केली आहे.

त्यानुसार, मा. उच्च न्यायालयाच्या दि.२४.११.२०२५ रोजीच्या आदेशानुसार, प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या, खरीप हंगाम २०२० मधील, धाराशीव जिल्ह्याचा उर्वरित(दुसरा) राज्य हिस्सा देय अनुदान रक्कम रु.१३४,११,९१,९३८/- इतका निधी, प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीकरिता आयुक्तालय स्तरावर उघडलेल्या ESCROW बँक खात्यामधील जमा झालेल्या परतावा रक्कमेतून जिल्हाधिकारी, धारशीव यांच्या विनंतीनुसार, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, धाराशीव यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

मा. उच्च न्यायालयाच्या दि.२४.११.२०२५ व दि.१८.१२.२०२५ रोजीच्या आदेशांनुसार, **धाराशीव जिल्हयातील** पात्र शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करण्याच्या अनुषंगाने, प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या **खरीप हंगाम, २०२० मधील, राज्य शासनाकडून देय असलेल्या अनुदानाच्या दुसऱ्या हप्त्याची रक्कम** रु.१३४,११,९१,९३८/- प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीकरिता आयुक्तालय स्तरावर उघडलेल्या ESCROW बँक खात्यामधील, जमा झालेल्या परतावा रकमेतून, जिल्हाधिकारी, धारशीव यांच्या विनंतीनुसार, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, धाराशीव यांना वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभाग अनौप. संदर्भ क्र.६७/२०२६/व्यय-१, दि.०९.०२.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०२६०२१११९३९०७६८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATIBHA MADHAV PATIL

Digitally signed by PRATIBHA MADHAV PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=b693d975fffc642fe6b87c2ce9e1297fd1e8bda9b459f85f75f159984ba680fd, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DA026E85AE8CBB4E3C2ACDBECBBF2F6D6CB0AE6ED5C1E54483490119EE0456AD, cn=PRATIBHA MADHAV PATIL
Date: 2026.02.11 19:40:18 +05'30'

**( प्रतिभा पाटील )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. अ.मु.स.(कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. जिल्हाधिकारी, धाराशिव
४. संचालक (कृषि प्र.व नि.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, धाराशिव
७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
८. सहाय्यक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/ धाराशिव
१०.महालेखापाल, महाराष्ट्र -१/२, (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर

११.वित्त विभाग (व्यय-१/ अर्थ-१३), मंत्रालय, मुंबई- ३२
१२.उप सचिव (११-अे /२-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
१३.विभागीय व्यवस्थापक, भारतीय कृषि विमा कंपनी, लोक चेंबर्स, मरोल मरोशी नाका, मरोल. अंधेरी(पूर्व), मुंबई - ४०० ०५९.
१४.विभागीय व्यवस्थापक, बजाज अलायन्झ जनरल इंन्शुरन्स कं.लि, कॉमर झोन, पहिला मजला, सम्राट अशोक मार्ग, फुले नगर, पुणे ४११००६.
१५.निवडनस्ती